पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/०५/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१८/०५/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - सभापती
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पवळे सुमनताई मधुकर
६. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
७. मा.कदम निकिता अर्जुन
८. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.वस्ते – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) प्रभाग क्र.३ चिखली येथील ऊंबर ओढयालगत जाणारा १८ मी. डी.पी. रस्त्या विकसित करणे या कामातून चिखली म्हेत्रेवाडी व मोरे वस्ती मधील पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागामार्फत खोदलेले ट्रेंचेस तसेच रस्ते पावसाळयापूर्वी दुरुस्त करणेबाबत – मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.४१ सन २०१७-१८ साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व फुले जयंती महोत्सवासाठी मंडप व्यवस्था करणेचे कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत - मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.सुरेश भोईर                                        अनुमोदक – मा.सुमनताई पवळे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका मा.आरती चोंधे यांचे पती कै.सुरेश चोंधे यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले असलेने तसेच सुमन पोपट काळोखे, सौ.शालन मारुती राऊत यांचेही नुकतेच निधन झालेले असलेने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहून सभा शुक्रवार दिनांक – २५/०५/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली )

मा.सभापती - शुक्रवार दिनांक – २५/०५/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २

**सभावृत्तांत**

( दिनांक १८/०५/२०१८ ची तहकूब सभा )

दिनांक - **२५/०५/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १८/०५/२०१८ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक **२५/०५/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - सभापती
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
४. मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे
५. मा.कदम निकिता अर्जुन
६. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आगळे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**अ**) दिनांक ०६/०४/२०१८ व ०९/०४/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**आ**) दिनांक १०/०५/२०१८ रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

**----------**

ठराव क्रमांक - ०४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २५/०५/२०१८ विभाग – प्रशासन
सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.सचिन भोसले
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३४/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – “ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)” अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०५ विषय क्रमांक - ०२
दिनांक - २५/०५/२०१८ विभाग – प्रशासन
सुचक : मा.मनिषा पवार अनुमोदक : मा.निकिता कदम

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३५/२०१८, दि.३१/०३/२०१८

विषय – "स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ" अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरणेकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देणेस मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सवानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०६ विषय क्रमांक - ०३
दिनांक - २५/०५/२०१८ विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक : मा.सचिन भोसले अनुमोदक : मा.उषा ढोरे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.मुका/वि/जा/३२/२०१८, दि.१८/०४/२०१८

विषय – "क" क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नविन प्रभाग क्र.८ येथील नव्याने होणा-या राष्ट्रीय स्केटींग मैदानासाठी अडथळा ठरत असलेल्या उच्चदाब वाहिन्या भुमिगत करणे.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ०७ विषय क्रमांक - ०४
दिनांक - २५/०५/२०१८
सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३ चिखली येथील उंबर ओढयालगत जाणारा १८ मी. डी.पी. रस्त्या विकसित करणे या कामातून सध्या आताचे प्रभाग क्र.१ चिखली, म्हेत्रेवाडी व मोरेवस्ती मधील पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागामार्फत खोदलेले ट्रेंचेस व काही रस्ते पावसाळयापूर्वी दुरुस्त करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर ठिकाणी अत्यंत दाट वर्दळीची लोकवस्ती असल्याने सदर ठिकाणच्या ४ ते ५ मी. रुंदीच्या व ७०० ते ८०० मी. लांबीच्या विविध सोसायटयांमधील रस्त्यांना खोदलेले ट्रेंचेस चे व रस्त्याचे साधारणत: एकूण क्षेत्र ९०५० चौ.मी. इतके विनाविलंब वरील कामातून पुर्ववत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०८ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २५/०५/२०१८

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.मनिषा पवार

संदर्भ – मा.उषा ढोरे, मा.मनिषा पवार यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.४१ सन २०१७-१८ साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व फुले जयंती महोत्सवासाठी मंडप व्यवस्था करणे या कामास सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात पान क्र.१२८ अ.क्र.१९ वर र.रु.१६,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता आहे. या कामाची व्याप्ती विचारात घेता निविदा क्र. ६०/०३/२०१७-१८ या कामास र.रु.२५,००,०००/- इतकी सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३२०/२०१८
दिनांक : २५/०५/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.